श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

पोस्ट :- शिर्डी – ४२३ १०९, ता.राहाता, जि.अहमदनगर

फोन नं.-०२४२३-२५८९९८, फॅक्स नं.-२५८८७०

E-Mail -electrical.dept@sai.org.in ,website: - www.sai.org.in

---

## जाहीर आव्हान

**(अ)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीमार्फत साजरे करणेत येणा-या **''श्रीपुण्यतिथी उत्सव-२०२४''** निमित्तश्रीं चे समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, मंदिर परिसर याठिकाणी (विनामुल्य) विद्युत रोषणाई करणेस व मंदिर परिसरातील गेट नं.०४ चे आतील बाजूस देखावा उभारणी करणेकामी तसेच संस्थानचे विविध इमारतींचे दर्शनीभागावर आकर्षक अशी विद्युत रोषणाई करणे.

(०१) नविन दर्शन लाईन इमारत
(०२) मंदिर परिसर बाहेरील बाजू (नगर मनमाड रोड )
(०३) शांतिनिवास व भक्तनिवास इमारत
(०४) श्री साई प्रसादालय
(०५) नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम)
(०६) साईआश्रम भक्तनिवास
(०७) साई धर्मशाळा
(०८) द्वारावती भक्तनिवास
(०९) श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय
(१०) शैक्षणिक संकुले

तरी, सर्व साईभक्तांना व विविध सजावट करणारे आर्ट कलाकार/डेकोरेटर्स यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत आव्हान करणेत येते की, **जे साईभक्त अथवा विविध सजावट करणारे आर्ट कलाकार / डेकोरेटर्स हे उपरोक्त नमुद मंदिर परिसरातील गेटनं.०४ चे आतील बाजुस देखावा उभारणी करणे तसेच श्रींचे समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, मंदिर परिसर व उपरोक्त अ.क्र.०१ ते अ.क्र.१० या विविध इमारतीवर दि.११-१०-२०२४ ते दि.१३-१०-२०२४ या कालावधीत देणगी स्वरुपात (विनामुल्य) विद्युत रोषणाई व देखावा उभारणी करणेस इच्छूक असतील** असे साईभक्तांनी अथवा विविध सजावट करणारे आर्ट कलाकार/डेकोरेटर्स यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे नांवे अर्ज करुन सदर अर्जाची सॉफ्ट कॉपी संस्थानचे ई-मेल electrical.dept@sai.org.in वर तसेच हार्ड कॉपी दि २१-०९-२०२४ रोजी दुपारी.१५:०० वा.पर्यंत अथवा तत्पुर्वी संस्थान कार्यालयात जमा करावीत. ( संस्थान मार्फत आर्ट कलाकार/डेकोरेटर्स यांची राहण्याची,तीन वेळचा चहा, सकाळचा नाष्टा, व दोन वेळचे जेवणाची सोय **"विनामुल्य"** करण्यात येईल.)

**(ब)** उपरोक्त **(अ)** मधील ''श्रीपुण्यतिथी उत्सव-२०२४''निमित्तश्रीं चे समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी, मंदिर परिसर याठिकाणी (विनामुल्य) विद्युत रोषणाई, मंदिर परिसरातील गेट नं.०४ चे आतील बाजूस देखावा उभारणी करणे,तसेच संस्थानचे विविध इमारतींचे दर्शनीभागावर आकर्षक अशी विद्युत रोषणाई करणेसंबधीत काम साईभक्तांना व विविध सजावट करणारे आर्ट कलाकार/ डेकोरेटर्स विनामुल्य करण्यास तयार नसल्यास त्यांनी संस्थानला सदरकामी येणाऱ्या खर्चाचे दरपत्रक दि २१-०९-२०२४ रोजी दुपारी.१५:०० वा.पर्यंत अथवा तत्पुर्वी संस्थान कार्यालयात जमा करावीत.

**खालीलप्रमाणे अटी-शर्तीस अधिन राहून काम करणे बंधनकारक राहील.***

०१). विद्युत रोषणाई करतांना सुरक्षा नियमांचे पालन करावे.
०२). सदरचे काम चालू असतांना साईभक्तास कोणतीही इजा होणार नाही यांची काळजी घेणेची संपुर्ण जबाबदारी आपणावर राहिल.
०३). विद्युत रोषणाई करतांना अथवा देखावा उभारतांनी सदर कामामुळे काही अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.
०४). विद्युत रोषणाई व देखाव्याचे उभारणीचे कामामुळे वरील पवित्र इमारतींचे काहीही नुकसान हॊऊ नये याची खबरदारी घ्यावी.
०५). मंदिर परिसरात विद्युत रोषणाई अथवा देखाव्याचे उभारणीचे काम करतांना परिसरात मोबाईल आणणे व वापरणे बंदी आहे यांची काळजी घेणेची संपुर्ण जबाबदारी आपणावर राहिल.
०६). विद्युत रोषणाई करतांना अथवा देखावा उभारतांनी योग्य ती खबरदारी घेणे आपणांवर बंधनकारक राहिल.

(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से. )
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**